सिंधुदुर्ग, शुक्रवार, २२ जुलै २०२२ शहर-जिल्हा पुढारी

# हळबे महाविद्यालयात पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र

**दोडामार्ग (पुढारी वृत्तसेवा) :** हळबे महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेटये, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, संस्था सदस्य सूर्यकांत परमेकर, राजेंद्र केळकर, विवेकानंद नाईक, युयुत्सू आर्ते, सतीश शिर्के उपस्थित होते. या पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये ३० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. हळबे महाविद्यालयाने येथील मुलांना संधी उपलब्ध करून दिल्याने या संधीचे सोने करून घेण्याची जबाबदारी आता मुलांवर आहे, असे मत विवेकानंद नाईक यांनी व्यक्त केले. आज आम्ही पोलिस यंत्रणेमुळे सुरक्षित आहोत. पोलिस विभागात मुलांसाठी अनेक संधी आहेत व त्या संधीचा उपयोग होणे आवश्यक आहे. येथे पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण सुरू झाले असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे मत कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. एन. जाधव तर आभार प्रीती प्रसादी यांनी मानले.